मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प(SMART)
जिल्हा अंमलबजावणी कक्ष, धुळे
प्रकल्प संचालक आत्मा,फळरोपवाटिका, पिंप्री, चाळीसगांव रोड, धुळे
ई-मेल- dhule.diu.smart@gmail.com

जा. क्र. प्र.सं/आत्मा/स्मार्ट/410/२०२३
प्रकल्प संचालक आत्मा कार्यालय,
धुळे दि. २४/०७/२०२३

प्रति,

मा. नोडल अधिकारी,
विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष,
नाशिक विभाग, नाशिक

**विषय** : जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट), पुणे या प्रकल्पात काम करताना मिळणा-या वेतनामधील तफावतीबाबत...

**संदर्भ** : श्री. जयेश आनंदा जगताप यांचे दि. २४/०७/२०२३ रोजीचे प्रकल्प संचालक, आत्मा, धुळे यांना दिलेले पत्र.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये या कार्यालयात कार्यरत श्री जयेश आनंदा जगताप पदनाम अर्थशास्त्रज्ञ तथा वित्तिय प्रवेश सल्लागार, धुळे या पदाकरीता जिल्हा अंमलबजावणी कक्ष, धुळे येथे नियुक्ती झालेली आहे.

अर्थशास्त्रज्ञ तथा वित्तिय प्रवेश सल्लागार पद भरती करिता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये रुपये ५००००/-(अक्षरी रक्कम- पन्नास हजार रुपये मात्र) मानधन/वेतन दर्शविण्यात आलेले होते.

सदर पदाकरिता जाहिराती मध्ये नमूद असलेले मानधन/वेतन व त्यांना दिलेल्या नियुक्ती पत्रामध्ये देण्यात आलेले मानधन/वेतन रक्कम रुपये २७,८३०/- (अक्षरी रक्कम- सत्ताविस हजार आठशे तीस रुपये मात्र) यामध्ये बरीच तफावत आहे. या पदाच्या कामाचे स्वरुप प्रकल्पातील सर्व जिल्हा अंमलबजावणी कक्षामध्ये एक सारखेच आहे. त्यामुळे मानधन/वेतन सर्व ठिकाणी एक सारखेच असायला हवे अशी या कार्यालयाची धारणा आहे. त्यांना मिळणा-या वेतनामधील तफावती बाबत विनंती अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले आहे. प्रकल्पातील कामाच्या दृष्टीकोनातुन पाहता असे लक्षात येते की प्रकल्पातील पदाच्या अनुषंगाने कामाची जबाबदारी व प्रत्यक्षात असणारे काम तसेच कामाच्या बदल्यात मिळणारे मानधन खूप कमी आहे.

तरी त्यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांच्या मानधनात वाढ करण्यात यावी ही विनंती.

**सोबत**- श्री. जयेश आनंदा जगताप यांचे विनंती अर्ज

(श्री. नवनाथ मु. कोळपकर)
**प्रकल्प संचालक, आत्मा तथा**
**प्रमुख, जिल्हा अंमलबजावणी कक्ष,**
**स्मार्ट प्रकल्प, धुळे**

**प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर :-**

१. मा. प्रकल्प संचालक, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट प्रकल्प, पुणे.
२. मा. प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष(कृषि), स्मार्ट प्रकल्प, पुणे.
३. मा.वित्त विशेषज्ञ,प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट प्रकल्प, पुणे.
४. मा. प्रमुख, विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक विभाग, नाशिक.
५. T & M Services Consulting Private Limited, Dahisar (East.) Mumbai - 400068, (SMART).

(श्री. नवनाथ मु. कोळपकर)
**प्रकल्प संचालक, आत्मा तथा**
**प्रमुख, जिल्हा अंमलबजावणी कक्ष, धुळे**

D:\Employees\मानधन वाढ.docx

दिनांक २४/०७/२०२३

टिपणी

**विषय** : जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पात काम करतांना मिळणाऱ्या मानधनातील तफावती बाबत...

**संदर्भ** :- १ T & M SERVICES CONSULTING PVT.LTD, MUMBAI मार्फत मिळालेले निवड आदेश पत्र Ref. No. TNM/MH/ID-३३३५०७/२०२२-२०२३ दिनांक १२/०१/२०२३

२. अर्थशास्त्रज्ञ तथा वित्तिय प्रवेश सल्लागार पद भरती करिता प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात दिनांक ०६/०७/२०२२.

टिपणी सविनय सादर करण्यात येते की, मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, धुळे येथील अधिकारी/कर्मचारी यांना मिळणाऱ्या वेतनातील तफावतीबाबत असे निदर्शनास येते की, अर्थशास्त्रज्ञ तथा वित्तिय प्रवेश सल्लागार या पदाच्या जाहिरातीत रुपये ५००००/- प्रति महा मानधन/वेतन दर्शविण्यात आले होते परंतु प्रत्यक्ष नियुक्ती पत्र देतांना रुपये २७,८३०/- प्रति महा मानधन/वेतन अदा करण्यात येत आहे. यामुळे प्रति महा मानधन रक्कमेत बरीच तफावत दिसून येते. म्हणून या टिपणी सोबतच्या पत्रात मानधन तफावत न राहता मला जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे मानधन अदा करण्यात यावे या आशयाचा प्रस्ताव मा नोडल अधिकारी, विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, नाशिक विभाग, नाशिक यांना सादर करणेबाबतचे पत्र स्वाक्षरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**अर्थशास्त्रज्ञ तथा वित्तिय प्रवेश सल्लागार**

**मुल्य साखळी व पुरवठा साखळी तज्ञ**

**नोडल अधिकारी**

**प्रकल्प संचालक आत्मा**

विनंती अर्ज

दिनांक :- २४/०७/२०२३

प्रति,

प्रकल्प संचालक, आत्मा तथा
प्रमुख, जिल्हा अंमलबजावणी कक्ष,
स्मार्ट प्रकल्प, धुळे

**विषय** :- जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पात काम करतांना मिळणाऱ्या मानधनातील तफावती बाबत..

**संदर्भ** :- १. T & M SERVICES CONSULTING PVT.LTD, MUMBAI मार्फत मिळालेले निवड आदेश पत्र Ref. No. TNM/MH/ID-३३३५०७/२०२२-२०२३ दिनांक १२/०१/२०२३.

२. अर्थशास्त्रज्ञ तथा वित्तिय प्रवेश सल्लागार पद भरती करिता प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात दिनांक ०६/०७/२०२२.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार विनंती अर्ज करतो की, माझी निवड संदर्भ १ नुसार, मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) अंतर्गत अर्थशास्त्रज्ञ तथा वित्तिय प्रवेश सल्लागार या पदाकरीता जिल्हा अंमलबजावणी कक्ष, धुळे येथे नियुक्ती झालेली आहे.

अर्थशास्त्रज्ञ तथा वित्तिय प्रवेश सल्लागार पद भरती करिता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये रुपये ५००००/-(अक्षरी रक्कम- पन्नास हजार रुपये फक्त) मानधन/वेतन दर्शविण्यात आलेले होते व त्यामुळेच सदरील पदाकरिता मी अर्ज सादर केला होता.

वरील पदाकरिता जाहिराती मध्ये नमूद असलेले मानधन/वेतन व मला नियुक्ती पत्रामध्ये देण्यात आलेले मानधन/वेतन रक्कम रुपये २७,८३०/- (अक्षरी रक्कम- सत्ताविस हजार आठशे तीस रुपये फक्त) यामध्ये बरीच तफावत आहे. या पदाच्या कामाचे स्वरूप प्रकल्पातील सर्व जिल्हा अंमलबजावणी कक्षामध्ये एक सारखेच आहे. त्यामुळे मानधन/वेतन सर्व ठिकाणी एक सारखेच असायला हवे अशी माझी धारणा आहे.

सध्याच्या महागाईचा दर लक्षात घेऊन व धुळे सारख्या शहरात मुख्यालयी कुंटुबासमवेत वास्तव्यास असल्याने मला जाहिरातील माझ्या पदाला मंजूर असलेले मानधन/वेतन मिळायला हवे. शासनाकडे झालेली सेवा लक्षात घेता तसेच माझ्या सारख्या पात्र व अनुभवी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाचा उपजिविकेचा सहानुभूतीपूर्वक विचार करून माझ्या नियुक्तीच्या तारखेपासुन फरकास मानधन मिळावे ही नम्र विनंती. माझ्या अर्जाचा सहानुतीपूर्वक विचार करून माझ्या पदाला स्मार्ट प्रकल्पात जाहीरातीमध्ये नमुद केलेले वेतन/मानधन योजनेच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे मिळावे ही नम्र विनंती.

लिपिक
आवक / जावक
कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा
(आत्मा), धुळे

आपला विश्वासु

(जयेश आ. जगताप)
**अर्थशास्त्रज्ञ,**
**जिल्हा अंमलबजावणी कक्ष**
**स्मार्ट प्रकल्प, धुळे.**

**प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर** :-

१. मा. प्रकल्प संचालक, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट प्रकल्प, पुणे.
२. मा. वित्त विशेषज्ञ, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, स्मार्ट प्रकल्प, पुणे.
३. मा. प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष(कृषि), स्मार्ट प्रकल्प, पुणे.
४. मा. विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक विभाग, नाशिक.
५. मा. H.R., T & M Services Consulting Private Limited, Dahisar (East.) Mumbai - 400068, (SMART).